**SEARCH**
**Society for Education, Action & Research in Community Health**
Shodh-Gram, P.O. & Dist. Gadchiroli (Maharashtra) 442 605, India
Ph: (91) 8275780316, E-mail : search.gad@gmail.com, Web site: www.searchforhealth.ngo

९ आक्टोबर २०२०

---

स. न.

गडचिरोली जिल्ह्यावर अेक संकट येअू घातलं आहे. ते थांबवण्यासाठी आपली मदत हवी आहे. म्हणून हे पत्र.

१. जगात सर्वत्रच आदिवासी हे दारुला मोठ्या प्रमाणात बळी पडले आहेत. त्यांच्या मागासलेपणाचे अेक कारण पुरुषांनी मोठ्या प्रमाणात दारु पिणे हे देखील आहे. ऑस्ट्रेलियातले आदिवासी तर गोऱ्या लोकांविषयी म्हणतात – "They came; killed us with the bullets and then with bottle".

२. भारतातील आदिवासींना यापासून वाचवण्यासाठी भारत सरकारची 'आदिवासी भागांसाठी मद्यनीती (१९७६)' आहे जी महाराष्ट्र शासनानेही राज्याचे धोरण म्हणून अधिकृतरीत्या लागू केली आहे. या धोरणानुसार
   १) आदिवासी भागात कोणतीच दारु दुकाने व दारु विक्री करता येत नाही.
   २) आदिवासींना स्वतःच्या घरगुती वापरासाठी पारंपारिक पध्दतीने दारु बनविण्याची व केवळ स्वतः सेवन करण्याची मुभा आहे. पण हा रिवाज देखील समाज शिक्षण व परिवर्तनाद्वारे हळुहळु बदलण्याचा प्रयत्न करावा.

३. 'पेसा' या घटना-दुरुस्ती व कायद्याने आदिवासी गावातील दारु व अंमली पदार्थांच्या वापराचे नियमन करण्याचा अधिकार आदिवासी गावांना आहे.

४. गडचिरोली जिल्ह्यात ११०० गाव हे 'आदिवासी प्रभाग' या अंतर्गत येतात. जिल्ह्यात ५ लक्ष आदिवासी राहतात ज्यातले अनेक Particularly Vulnerable Tribal Groups (PVTG) मधे मोडतात. PVTG च्या अस्तित्वाचे रक्षण करण्याची विशेषच काळजी घेतली पाहिजे.

५. गडचिरोली जिल्ह्यात दारुबंदीसाठी १९८७-९३ अशी सहा वर्षे व्यापक अहिंसक जनआंदोलन चालले. त्याला प्रतिसाद देअून श्री. शरद पवार मुख्यमंत्री असतांना १९९३ साली महाराष्ट्र

शासनाने इथे दारुबंदी लागू केली. शासन-पुरस्कृत सर्व दारुविक्री थांबली. दारु पूर्वीपेक्षा जवळपास ५० टक्के कमी झाली. अुरलेली दारु आदिवासींनी स्वतः वापरासाठी घरी बनवलेली किंवा बाहेरुन बेकायदा आलेली होती.

६. २०१६ पासून जिल्ह्यात मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील शासकीय टास्कफोर्सच्या अंतर्गत व सर्च संस्थेच्या पुढाकाराने दारु-तंबाखू मुक्तीसाठी 'मुक्तीपथ' अभियान सुरु झाले. यात जिल्हाव्यापी माहिती व जनजागृती, गाव संघटनेद्वारे सामुहिक निर्णय व कृती, शासकीय बंदीची अंमलबजावणी व व्यसनमुक्ती अुपचार अशा चार कलमी कार्यक्रमाचे व्यापक जाळे व अभियान अुभे करण्यात आले.

७. **परिणामतः** ११०० गावात ग्रामसंघटना स्थापन झाल्या. गावा-गावांनी आपल्या गावात दारुबंदीचे प्रस्ताव पारित केले

१००० सामुहिक अहिंसक कृतीद्वारे गावातील दारु-तंबाखू विक्री बंद केली

आज ७०० गावात गावकरी + पोलीस सहयोगाने दारु विक्री व ३०० गावात तंबाखू विक्री बंद आहे.

२००० व्यसनींचा अुपचार सुरु आहे

विद्यापीठाच्या मदतीने शास्त्रीयरीत्या केलेल्या जिल्हा सँपल सर्वेद्वारा मोजले असता २०१५ च्या तुलनेत २०१९-२० मधे

- दारु सेवन करणाऱ्या पुरुषांचे प्रमाण २०१५ पेक्षा अजून २५% कमी झाले अर्थात ४०,००० पुरुषांनी दारु सोडली/सुटली.
- अंदाजे ७०,००० स्त्री पुरुषांनी तंबाखू सोडली/सुटली.
- बेकायदेशीर दारुचा वार्षिक खप रु. ४८ कोटींनी कमी व तंबाखूवरील खर्च रु. ३० कोटींनी कमी झाला.

महाराष्ट्र राज्यात शासनपुरस्कृत दारुचा खप वर्षाला किमान रु. ५०,००० कोटीच्या दरम्यान आहे. (अवैध दारु वेगळी) गडचिरोलीच्या (१२ लक्ष) लोकसंख्येअेवढी महाराष्ट्रातली सरासरी लोकसंख्या वर्षाला रु. ५०० कोटींची दारु पिते. गडचिरोलीत १२ लक्ष लोकसंख्येत २०१९-२० मधे अुर्वरित दारु (सर्व अवैध) रु. ६४ कोटी, अर्थात महाराष्ट्राच्या सरासरीपेक्षा फक्त १३ टक्के आहे.

**दारुबंदी व मुक्तीपथ यशस्वी झाले आहेत.**

८. **फायदे :**

- लोकांची प्रचंड मोठी आर्थिक बचत
- ४०,००० पुरुषांची दारु सुटली, व ७०,००० स्त्री-पुरुषांची तंबाखू सुटली.
- पुरुषांवर दारु पिण्याचे दुष्परिणाम जवळपास ५०% कमी
- स्त्रियांची सामुहिक शक्ती व सुरक्षा वाढली
- गावपातळीची लोकशाही बळकट झाली. नक्षलवादाअैवजी लोकशाही, प्रशासन व ग्राम-स्वराज्य यांचा वाढता स्वीकार.
- दारु व तंबाखूच्या प्रभावी नियंत्रणाचे जिल्हाव्यापी मॉडेल अुभे राहिले.

९. दीड वर्षापूर्वी मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील ६ मंत्र्यांच्या टास्कफोर्सने आढावा घेअून या यशस्वी मॉडेलचा स्वीकार केला व तो गडचिरोलीत सुरु ठेवून शासकीय दारुबंदी असलेल्या शेजारच्या चंद्रपूर व वर्धा जिल्ह्यांमधेही सुरु करावा असा निर्णय घेतला.

१०. **संकट :** चंद्रपूर जिल्ह्यात स्त्रियांच्या व्यापक आंदोलनानंतर व ५८५ ग्रामपंचायती व जिल्हा परिषदेच्या अधिकृत प्रस्तावानंतर २०१५ साली दारुबंदी लागू करण्यात आली. परंतु चंद्रपूरचे आमदार (कॉंग्रेस) व पालकमंत्री तथा महाराष्ट्राचे आपत्ती-निवारण मत्री श्री. विजय वडेट्टीवार यांनी २०१९ मधे निवडून आल्यापासून इतर कोणतीही आपत्ती न सोडवता प्रथम चंद्रपूर जिल्ह्याची दारुबंदी अुठविण्याच्या अेक कलमी कार्यक्रमाची मागणी व प्रयत्न सुरु केले आहेत.

त्यासाठी अगोदर चंद्रपूर जिल्ह्यातील दारुबंदी अुठवायची हा निर्णय जाहीर करुन मग ‘दारुबंदीची समीक्षा समिती’ नावाचा फार्स त्यांनी केला. ज्यांनी दारु बंद करण्यासाठी पाच वर्षे गावोगावी आंदोलन केले होते त्या लाखो स्त्रियांचा आवाज मूकच राहिला. चंद्रपूरमधील दारुबंदीची अंमलबजावणी प्रभावी करण्याअैवजी ‘पालक’ मंत्र्यांनी वैधानिक ग्रामपंचायतींचे व जिल्हा परिषदेचे प्रस्ताव तथा राज्य मंत्रिमंडळाच्या निर्णयाविरुध्द काम सुरु केले. या ‘समिक्षा समिती’ च्या आधारे ते जिल्ह्यातील दारुबंदी अुठविण्याचे समर्थन करीत आहेत. वस्तुतः जिल्ह्याच्या वरीष्ठ अधिकाऱ्यांच्या या समीक्षा समितीने आपल्या अहवालात तशी शिफारस करण्याचे नाकारले आहे.

आता श्री. वडेट्टीवार व अुत्पादनशुल्क मंत्री श्री. दिलीप वळसे-पाटील यांनी बैठक करुन निर्णय घेतला आहे की चंद्रपूर सोबत गडचिरोली जिल्ह्यातली दारुबंदी अुठवण्याचा विचार करण्यासाठी समिती स्थापन करायची. आणि हा निर्णय श्री. वडेट्टीवारांनी नेमका २ आक्टोबरला जाहीर केला.

*समिती स्थापना केवळ दिखावा असून या दोन जिल्ह्यात दारु विक्री पुन्हा सुरु करण्याच्या दिशेने ही सुरवात आहे.*

११. याचे तत्काळ व लांब पल्ल्याचे **संभाव्य दुष्परिणाम असे**

अ) आदिवासी व स्त्रिया यांचे आरोग्य, सुरक्षा व आर्थिक विकास धोक्यात येईल.
भारतातील सहा राज्यातील दारुबंदीचा अभ्यास करुन हारवर्ड विद्यापीठ व वर्ल्ड बँकच्या तज्ञांनी प्रकाशित निश्कर्ष (अमेरिकन इकॉनॉमिक रिव्यू) असा आहे - शासकीय दारुबंदीने दारुचे प्रमाण ४० टक्के व स्त्रियांवरील गुन्हे व अत्याचारांचे प्रमाण ५० टक्के कमी होते. दर अेक लक्ष लोकसंख्येमागे स्त्रियांविरुध्द गंभीर गुन्हे व अत्याचार वर्षाला ४००० ने कमी होतात. (अर्थात दारुबंदी अुठविल्यास स्त्रियांवर अत्याचाराचे गुन्हे चंद्रपूर जिल्ह्यात वर्षाला ९०,००० व गडचिरोलीत ५०,००० ने वाढतील. यात निर्भयाकांड व हाथरसकांड सारखे गुन्हेही आलेत.)

आ) पुरुषांमधील दारु पिणे, व्यसन, अपघात, शारीरिक रोग, गुन्हे व आत्महत्त्या वाढतील. जागतिक अभ्यास (Global Burden of Disease) जगातील मृत्यू व रोग निर्मिती करणाऱ्या सर्वोच्च सात कारणांपैकी अेक कारण दारु आहे असे म्हणतो.

इ) ग्रामसंघटना व गावपातळीची लोकशाही यावरुन लोकांचा विश्वास अुडेल. ‘महाराष्ट्र शासनापेक्षा नक्षलवादी बरे’ असे ते म्हणतील. म्हणूनच, महाराष्ट्राचे माजी अुपमुख्यमंत्री व गडचिरोलीचे पालकमंत्री स्व. आर आर पाटील म्हणाले होते की “गडचिरोलीतील नक्षलवादाचा जन्म मंत्रालयात होतो”.

ई) चंद्रपूर जिल्ह्यात (लोकसंख्या २२ लक्ष) २०१५ मधे दारुबंदी पूर्वी वर्षाला ७०० कोटी रुपयांची दारु खपत होती असे श्री. वडेट्टीवार अुत्पादन शुल्क खात्याच्या हवाल्याने म्हणतात. (पाच वर्षानंतर ती सहज १००० कोटी रुपयांची खपेल.) यात गडचिरोलीची १२ लक्ष लोकसंख्या जोडल्यास वर्षाला अेकूण १५०० कोटी रुपयांचे दारुचे मार्केट त्यांना दिसत असावे. यातून वार्षिक दीड हजार कोटींचे दारु-साम्राज्य निर्माण होईल. दारु-पैसा-सत्ता यासाठी अेक कायमस्वरुपी साम्राज्य अुभे राहील. मग इतर पक्ष व अुमेदवारांना निवडणूक जिंकण्याची आशाच नाही. लोकशाही पराजित होईल.

*गडचिरोली व चंद्रपूर येथील आदिवासी, स्त्रिया, ग्रामसभा व ग्रामपंचायती या सर्वांना बाजूला करुन अेक ‘मद्यसत्ता’ अुभारण्याचा मार्ग मोकळा करण्यासाठी कोरोनामुळे जनता लॉकडाअून मधे असतांना ही समिती स्थापन होणार आहे.*

आपली मदत

- महाराष्ट्रातील सुजाण व प्रभावशाली व्यक्ती, संघटना व संस्था यांनी गडचिरोली व चंद्रपूर वरील संकट थांबवण्याचे आवाहन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. अुध्दव ठाकरे, तसेच श्री. शरद पवार, श्री. वळसे-पाटील, कॉँग्रेसचे राज्यपातळीचे नेते श्री. बाळासाहेब थोरात, मान. राज्यपाल व राष्ट्रीय नेते श्री. राहुल गांधी, या सर्वांना आपल्या लेटरहेडवर निवेदन पाठवावे. (निवेदनाचे प्रारुप व इ-मेल पत्ते संलग्न).
- शक्य असल्यास व्यक्तिशः फोन करावे.
- वर्तमानपत्रे, मिडियामधे यासाठी वक्तव्य, लेख व पत्रे लिहावीत.
- स्त्री संघटना, आदिवासी संघटना, कामगार संघटना, सेवाभावी संस्था, व्यसनमु-मुक्ती संस्था, अंधश्रध्दा निर्मूलन चळवळी, शैक्षणिक संस्था व समाज परिवर्तनवादी संघटना या सर्वांनी प्रस्ताव पारित करुन आपल्या संघटनेत या बद्दल जागृती करावी, व जाहीर निवेदन करावे, तसेच ते वरील नेत्यांना पाठवावे.
- प्रत्येक निवेदन/पत्राची सहप्रत या पत्त्यावर आमच्यासाठी पाठवावी. (darumuktigadchiroli@gmail.com)

गडचिरोली जिल्ह्यातील चार लक्ष स्त्रिया व पाच लक्ष आदिवासी यांना आपली मदत हवी आहे.

आपले

**अभय बंग** **राणी बंग**

सर्च व मुक्तीपथ
गडचिरोली